THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 8TH MARCH 1894.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### मुंबई इलाख्यांतील पेंठ प्रांतांत अमलांत असलेला कायदा सुधारण्याकरितां आक्टाचा मसुदा.

हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ स्टेट ह्यांनीं कौन्सिलांत तारीख १४ माहे जुलई सन १८८९ चा ठराव करून स्टाटूट ३३ व्हिक्टोरिया, चाप्टर ३, कलम १, ह्यांतील ठराव पेंठ प्रांतास लागू करण्याबद्दल ठरविलें आहे: या पेंठ प्रांतांत, नासिक जिल्ह्यांत अमलांत असलेला कायदा अमलांत असणें आणि तो प्रांत सन १८७४ चा शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट ह्याअन्वयें शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट असण्याचा बंद होणें हें ज्याअर्थीं इष्ट आहे, आणि ज्याअर्थीं सन १८९२ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलांबाबद आक्ट ह्याच्या ९ व्या कलमाअन्वयें लागणारी नामदार गव्हर्नर जनरल ह्यांची आगाऊ मंजुरी हा आक्ट करण्याकरितां मिळविण्यांत आली आहे, त्याअर्थीं ह्यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यात येत आहे:—

१. (१) ह्या आक्टास सन १८९ चा पेंठच्या कायद्यांबाबद आक्ट असें ह्मणावें; आणि — सरनामा आणि सुरुवात.

(२) तो तारीख माहे———————सन रोजीं अमलांत येईल.

२. सन १८७४ चा शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट ह्याच्या पहिल्या कलमांतल्या "शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट" संज्ञेच्या व्याख्येंत कांहीं जरी लिहिलेलें असलें तरी, त्या आक्टाच्या अर्थाअन्वयें पेंठ प्रांतास शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट समजूं नये. — सन १८७४ चा आक्ट १४ वा, ह्याची पेंठ प्रांताच्या संबंधानें सुधारणा.

३. जे कायदे नासिक जिल्ह्यांत अमलांत असून पेंठ प्रांतांत अमलांत नसतील ते सर्व सदर्हू प्रांतांत अमलांत येतील. — नासिकचे कायदे पेंठ प्रांतास लागू करणें.

४. जे कायदे सदर्हू पेंठ प्रांतांत अमलांत असून नासिक जिल्ह्यांत अमलांत नसतील, ते सर्व सदर्हू प्रांतांत रद्द होतील. — इतर कायदे रद्द करणें.

५. हा आक्ट अमलांत येण्याच्या दिवसाच्या आधीं सदर्हू प्रांतांत कोणत्याही अधिकाऱ्यासमोर सुरू झालेल्या आणि त्या दिवसापर्यंत निकाल न झालेल्या सर्व कामांचा निकाल गव्हर्नर इन् कौन्सिल हे फर्मावितील त्या अधिकाऱ्यानें केला पाहिजे; — निकाल न झालेलीं कामें.

आणि हा वरील ठराव शिवायकरून, तीं कामें हा आक्ट झाला नसता तर जशीं चाल-लीं असतीं तशींच चालविलीं पाहिजेत.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

१. हिंदुस्तानचे सेक्रेटरी आफ स्टेट इन् कौन्सिल ह्यांच्या तारीख १४ माहे जुलै सन १८८९ च्या ठरावावरून, पेंठ प्रांत, सन १८७४ चा शेडयूल्ड डिस्ट्रिक्ट आक्ट, कलम १, तिसरा पारिग्राफ, ह्याअन्वयें शेडयूल्ड डिस्ट्रिक्ट झाला.

२. पेंठ प्रांताच्या संबंधानें कांहीं विशेष प्रकारची व्यवस्था असण्याची जरूरी असावी इतका तो आतां मागसलेला नाहीं. शिवाय, सदहू प्रांत, मुंबई-इलाख्याच्या बाकीच्या भागांमध्यें जे कायदेकानू अमलांत आहेत, त्यांच्या अमलांतून वगळल्यामुळें गैरसोय होते.

३. पेंठ प्रांताच्या पूर्वभागास लागून असलेल्या नासिक जिल्ह्यांत जो कायदा चालू आहे तो कायदा आणि पेंठ प्रांतांतला कायदा एक करावा हा ह्या मसुद्याचा उद्देश आहे. हा मसुदा दाखल करण्यास, नामदार गव्हर्नर जनरल ह्यांनीं, सन १८९२ चा हिंदुस्थानच्या कौन्सिलांबावत आक्ट ह्याच्या ९ व्या कलमाअन्वयें परवानगी दिली आहे.

४. निकाल न झालेलीं कामें ह्या मसुद्यांत निराळीं काढण्यांत आलीं आहेत, आणि त्यांत असें ठरविलें आहे कीं, तो अमलांत येईल त्या दिवसापासून पेंठ प्रांत शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट असण्याचा बंद होईल आणि त्यांत, नासिक जिल्ह्यांत अमलांत असलेले सर्व कायदे अमलांत येऊन इतर कोणतेही कायदे अमलांत राहणार नाहींत.

तारीख २ माहे मार्च सन १८९४.

(सही) एच्. बर्डवुड.

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) सी. एच्. ए. हिल्,

मुंबईचे गव्हर्नर ह्यांच्या कायदे कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा सुधारण्याकरितां मसुदा.

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याचे रीतीविषयींचा कायदा सुधारणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. सदर्हू कायद्याच्या ४४ व्या कलमांत, "१३०" हा आंकडा आणि "३०२" हा आंकडा ह्यांच्या दरम्यान, "१४३, १४४, १४५, १४७, १४८" हे आंकडे दाखल करावे.

सन १८८२ चा आक्ट १० वा, कलम ४४, ह्याची सुधारणा.

२. सदर्हू कायद्याच्या ४५ व्या कलमाच्या ऐवजीं खालील मजकुर दाखल करावा: तो मजकुर येणेंप्रमाणें:—

१८८२ चा आक्ट १० वा, ह्याच्या ४५ व्या कलमाऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

"४५. प्रत्येक गांवच्या मुख्यानें, गांवच्या कुळकर्ण्यानें, गांवच्या जागल्यानें, गांवच्या पोलीस-अमलदारानें, जमिनीच्या मालकानें किंवा वहिवाट करणारानें, व अशा मालकाच्या किंवा वहिवाट करणाराच्या मुखत्यारानें, आणि सरकार तर्फे अगर कोर्ट आफ वार्डस तर्फे महसूल किंवा जमिनीचे खंड वसूल करण्याच्या कामावर ज्या ज्या अमलदारास नेमिलें असेल त्या त्या अमलदारानें, खालीं लिहिलेल्या गोष्टींबाबद त्यास जी बातमी लागेल ती, अगदीं जवळचा माजिस्ट्रेट किंवा अगदीं जवळचें पोलीस-ठाणें स्वाधीन असणारा अमलदार, यांतून जो अधिक जवळ असेल त्यास, तत्काळ दिली पाहिजे:—

गांवचे मुख्य, कुळकर्णी, जमीन धारण करणारे व इतर ह्यांनीं कित्येक गोष्टींबाबद रिपोर्ट केला पाहिजे.

(अ) तो ज्या कोणत्याही गांवचा मुख्य, कुळकर्णी, जागला किंवा पोलीस-अमलदार असेल, किंवा ज्या गांवांत त्याची जमीन असेल, किंवा तो जमिनीची वहिवाट करीत असेल, किंवा मुखत्यार असेल किंवा महसूल किंवा खंड वसूल करीत असेल, त्या गांवांत चोरीचा माल घेणाऱ्या किंवा विकणाऱ्या कोणत्याही महशूर मनुष्याचें कायमचें किंवा हंगामी राहणें आहे ही गोष्ट;

(ब) जो कोणताही मनुष्य ठग असल्याचें, जबरी चोरी करणारा असल्याचें, अपराधाची शाबिती झालेला कैदी असून पळालेला असल्याचें किंवा अपराधी असल्याबद्दल जाहिरनामा ज्याविषयीं लागला आहे असा असल्याचें त्यास माहीत असेल किंवा तसा त्यास ज्याविषयीं वाजवी रीतीनें वहीम असेल, तो सदर्हू गांवांतील कोणत्याही जागीं येतो किंवा त्या गांवांमधून जातो ही गोष्ट;

(क) सदर्हू गांवांत किंवा गांवाजवळ, जामीन न घेण्याजोगा किंवा हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या १४३, १४४, १४५, १४७, अगर १४८ कलमांअन्वयें शिक्षा होण्याजोगा अपराध घडणें किंवा करण्याचा इरादा असणें ही गोष्ट;

(ड) सदर्हू गांवांत अगर गांवाजवळ कोणी मनुष्य अकस्मात किंवा अस्वाभाविक रीतीनें मरण पावला आहे किंवा संशय येण्यासारखी हकीकत असून मेला आहे ही गोष्ट;

(इ) बंदोबस्त राखण्याच्या कामीं किंवा अपराधाचा प्रतिबंध करण्याच्या कामीं व्यत्यय येण्याचा अगर लोकांच्या किंवा मालमत्तेच्या सलामतीस धोका पोंचण्याचा ज्या गोष्टीवरून संभव आहे अशा ज्या गोष्टीच्या संबंधानें बातमी देण्याविषयीं जिल्हा माजिस्ट्रेटानें स्थानिक सरकारच्या

आगाऊ मंजुरीनिशीं केलेल्या साधारण अगर विशेष हुकुमानें त्यास फर्माविलें असेल, ती गोष्ट;

"खुलासा १. या कलमांतील गांव या शब्दांत गांवच्या जमिनींचा समावेश होतो.

"खुलासा २. ज्या कोणत्याही गांवाकरितां इतर कोणत्याही कायद्याअन्वयें गांवचा मुख्य नेमिलेला नसेल, त्या गांवांत ह्या कलमाच्या कारणांसाठीं एक अगर अधिक गांवचे मुख्य नेमण्याचा जिल्हा माजिस्ट्रेटास अखत्यार आहे."

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

गैर कायद्याची मंडळी जमण्याचा आणि गर्दी करण्याचा अपराध करण्यांत आल्याबद्दल अगर तसा अपराध करण्याचा इरादा असल्याबद्दल लोकांस जी माहिती असेल, ती कळविण्याबद्दल त्यांस भाग पाडण्यासाठीं, क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या ४९ व्या कलमाअन्वयें ज्या अमलदारांनीं अधिकाऱ्यांस बातमी देणें भाग आहे त्या अमलदारांमध्यें, गांवचे कुळकर्णी यांचा, ते नेमलेले असतील तेथें, समावेश करण्यासाठीं, आणि ज्या बाबतींबद्दल बातमी द्यावयाची त्यांत, गैर कायद्याच्या मंडळ्या जमणें, गर्दी करणें, आणि स्वस्थता राखण्यासंबंधी आणि अपराध न होऊं देण्यासंबंधी एकंदर सर्व गोष्टी, ह्यांचा समावेश करण्यासाठीं, हा मसुदा तयार केला आहे. सर्व माहीतगार मनुष्यांनीं, सार्वजनिक स्वस्थतेचा भंग न होऊं देण्याच्या कामीं सरकारी अधिकाऱ्यांस मदत केली पाहिजे असा सरकारचा अभिप्राय आहे. अशी माहिती मिळविण्यास गांवच्या कुळकर्ण्यांस विशेष सवडी असतात ह्मणून, ती माहिती माजिस्ट्रेटास अगर पोलिसास कळविण्याची जबाबदारी त्यांवर ठेविली पाहिजे असें सरकारास वाटतें.

ज्या कोणत्याही गांवाकरितां इतर कोणत्याही कायद्याअन्वयें गांवचा मुख्य नेमिलेला नसेल त्या गांवांत ह्या मसुद्याच्या कारणांसाठीं एक गांवचा मुख्य नेमण्यास माजिस्ट्रेटास अधिकार दिला आहे.

तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १८९४.

ए. पी. म्याकडोनेल,

(True Translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.